# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# प्रादेशिक बातमीपत्र
# सकाळी 07 वाजून 10 मि

**दिनांकः18.11.2024** **वारःसोमवार**

---

•विधानसभा निवडणूक प्रचाराचा आज अखेरचा दिवस; सर्वच पक्षांच्या नेत्यांकडून जोरदार प्रचार

•प्रचार फेऱ्या, पदयात्रा, आणि मतदारांच्या प्रत्यक्ष भेटीवर विविध पक्षांच्या उमेदवारांचा भर

•येत्या 20 नोव्हेंबरला होणाऱ्या मतदानासाठी राज्यात निवडणूक यंत्रणा सज्ज; मोठ्या संख्येनं मतदान करण्याचं मुख्य निवडणूक अधिकारी एस. चोक्कलिंगम यांचं आवाहन

•महिलांच्या आशिया चषक हॉकी स्पर्धेत भारताची विजयाची मालिका कायम; जपानवर 3 - 0 अशी मात

**<u>राज्य विधान सभा प्रचार</u>**

राज्य विधानसभा निवडणुकीच्या प्रचाराचा आजचा शेवटचा दिवस आहे. गेले 10 – 15 निवडणूक प्रचारानं संपूर्ण राज्यातलं वातावरण ढवळून निघालं होतं; या प्रचारतोफा आज संध्याकाळी थंडावतील.

दरम्यान, काल रविवारच्या सुटीचा मुहूर्त साधत, अनेक उमेदवारांनी मतदारांच्या प्रत्यक्ष भेटींवर भर दिला. राज्यभरात गृह भेटी, पदयात्रा, प्रचार फेऱ्या काढण्यात आल्या होत्या. विविध पक्षांच्या देशभरातल्या दिग्गज नेत्यांनी आपापल्या पक्षाच्या उमेदवारांसाठी प्रचार सभा, रोड शो घेत मतदारांना आकर्षित करण्याचा प्रयत्न केला. कॉंग्रेस पक्षाचे अध्यक्ष मल्लिकार्जुन खर्गे, भाजपा नेते आणि केंद्रीय मंत्री शिवराज सिंग चौहान, उत्तर प्रदेशचे मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ, खासदार कंगना रनौत, काँग्रेसच्या नेत्या प्रियांका गांधी, राजस्थानचे नेते सचिन पायलट, बसपा नेत्या मायावती, मनसेचे अध्यक्ष राज ठाकरे यांच्यासह राज्यातल्या अनेक मातब्बर नेत्यांनी काल ठीकठिकाणी प्रचार फेऱ्या आणि झंजावाती प्रचारसभाही घेतल्या.

महायुतीचे सरकार आता सत्तेतून पाय उतार होईल. आणि आम्ही एक सक्षम आणि स्थिर सरकार महाराष्ट्रात देऊ, असा विश्वास, काँग्रेसचे अध्यक्ष मल्लिकार्जुन खर्गे यांनी काल कोल्हापुरात पत्रकारांशी बोलताना व्यक्त केला.

काँग्रेसच्या नेत्या प्रियांका गांधी यांनी गडचिरोली जिल्ह्यात प्रचार सभा घेतल्या. केंद्र सरकार जाती निहाय जनगणनेला का घाबरत आहे असा सवाल त्यांनी उपस्थित केला.

महाविकास आघाडीतर्फे काल मुंबईत जाहीर सभा झाली. महाविकास आघाडीचं सरकार सत्तेवर आणा; आमचं सरकार सोयाबीनला सात हजार रुपये भाव दिल्याशिवाय स्वस्थ बसणार नाही, अशी ग्वाही शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे प्रमुख उद्धव ठाकरे यांनी यावेळी दिली.

बहुजन समाज पक्षाच्या राष्ट्रीय अध्यक्ष आणि उत्तर प्रदेशच्या माजी मुख्यमंत्री मायावती यांनी काल पुण्यात जाहीर सभा घेतली. वडगाव शेरीचे उमेदवार डॉ. हुलगेश चलवादी यांच्यासह राज्यातील बसप उमेदवारांना मतदान करण्याचं आवाहन त्यांनी केलं.

भाजपा नेते आणि केंद्रीय मंत्री शिवराज सिंग चौहान यांनी काल नागपूर इथं वार्ताहर परिषद घेतली. राज्यातल्या विधानसभा निवडणुकीत महायुतीचा महाविजय होईल, असा विश्वास चौहान यांनी यावेळी व्यक्त केला.

महाविकास आघाडीत एकमेकांची फसवणूक करण्याचे प्रयत्न सुरू असून, अंतर्गत वादाची कुस्ती सुरू असल्याची टीका उत्तरप्रदेशचे मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांनी काल कोल्हापुरातल्या जाहीर सभेत केली.

भाजपा नेते आणि केंद्रीय मंत्री नीतिन गडकरी यांनी काल अहिल्यानगर जिल्ह्यात दोन प्रचार सभा घेतल्या. संविधान बदलण्याची भाषा विरोधक करत आहेत; मात्र आम्ही संविधान बदलू देणार नसल्याचं ठाम प्रतिपादन गडकरी यांनी यावेळी केलं.

राज्यात महायुतीचं डबल इंजिन सरकारच येणार असून, तेच महाराष्ट्राला विकासाच्या आणि प्रगतीच्या मार्गावर पुढे नेत राहील, असा विश्वास राज्याचे मुख्यमंत्री आणि शिवसेना नेते एकनाथ शिंदे यांनी काल धुळे जिल्ह्यातल्या साक्री इथं जाहीर सभेत व्यक्त केला.

राज्यातल्या कापूस आणि सोयाबीन उत्पादक शेतकऱ्यांना दिलासा देण्यासाठी जास्तीची खरेदी केंद्र सुरू करणार असून, या शेतकऱ्यांना हमी भाव देण्यासंदर्भात केंद्रीय मंत्र्यांशी चर्चा झाल्याची माहिती एकनाथ शिंदे यांनी दिली. नंदुरबार जिल्ह्यात प्रचार सभा घेतल्यानंतर ते काल धडगाव इथं पत्रकारांशी बोलत होते.

भाजपा नेते आणि उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी काल कोल्हापूर आणि नाशिकमध्ये प्रचार सभांना संबोधित केलं. तर राष्ट्रवादी कॉंग्रेसचे प्रमुख, उपमुख्यमंत्री अजित पवार यांनीही नाशिक जिल्ह्यातल्या देवळाली मतदारसंघात सरोज अहिरे यांच्या प्रचारासाठी सभा घेतली.

महाराष्ट्र नेहमीच देशाला दिशा दाखवत आला आहे; या विधानसभा निवडणुकीतही परिवर्तन घडवत महाराष्ट्र, देशाला योग्य दिशा दाखवेल, असा विश्वास कॉंग्रेस नेते आणि राजस्थानचे माजी उपमुख्यमंत्री सचिन पायलट यांनी पुण्यात पत्रकार परिषदेत बोलताना व्यक्त केला.

शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे प्रमुख उद्धव ठाकरे यांनी काल बोईसरमध्ये प्रचारसभा घेतली. तर युवासेना प्रमुख आदित्य ठाकरे यांनी सिंधुदुर्ग जिल्हयात देवगड आणि कुडाळ तालुक्यातल्या माणगाव इथं महाविकास आघाडीच्या उमेदवारांसाठी प्रचारसभा घेतल्या. कोकणचा शाश्वत विकास करण्याचं काम महाविकास आघाडीचं सरकार नक्की करेल असा विश्वास आदित्य ठाकरे यांनी व्यक्त केला.

नाशिक शहरात मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांनी प्रचार सभा घेतली.

या प्रादेशिक बातम्या आपण आकाशवाणीच्या पुणे केंद्रावरुन ऐकत आहात.

**<u>यंत्रणासज्ज</u>**

राज्यातल्या 288 विधानसभा मतदारसंघांमध्ये आणि नांदेड लोकसभा पोटनिवडणुकीसाठी येत्या बुधवारी 20 नोव्हेंबर रोजी मतदान होणार आहे. राज्यातल्या 9 कोटी 70 लाख 25 हजार 119 मतदारांसाठी 1 लाख 427 मतदान केंद्रांवर मतदानाची व्यवस्था करण्यात आली आहे. सकाळी 7 ते संध्याकाळी 6 वाजेपर्यंत मतदान करता येणार आहे. संवेदनशील मतदान केंद्रांवर केंद्रीय राखीव पोलीस दलाच्या तुकड्या तैनात करण्यात आल्या आहेत. प्रशासनाकडून निवडणुकीची संपूर्ण तयारी झाली असून राज्यातल्या मतदारांनी मोठ्या संख्येनं मतदान करण्याचं आवाहन मुख्य निवडणूक अधिकारी एस. चोक्कलिंगम यांनी केलं आहे. गडचिरोली जिल्ह्यातल्या संवेदनशील आणि अतिसंवेदनशील मतदान केंद्रांवर वायुसेनेच्या हेलिकॉप्टरच्या मदतीनं मतदान पथकं रवाना होत आहेत.

**<u>आवाहन</u>**

विधानसभा निवडणुकीमध्ये मतदानाची टक्केवारी वाढवण्यासाठी निवडणूक आयोग प्रयत्नशील आहे. निवडणूक आयोगानं ज्येष्ठ नागरिक आणि दिव्यांगांसाठी गृह मतदानाची सुविधाही उपलब्ध करुन दिली आहे. ज्येष्ठ साहित्यिक मधु मंगेश कर्णिक यांनी काल कणकवली विधानसभा मतदार संघात करुळ इथल्या आपल्या निवासस्थानी गृह मतदानाचा हक्क बजावला. प्रत्येक पात्र मतदारानं आपलं मतदानाचं पवित्र कर्तव्य बजावावं असं आवाहन त्यांनी यावेळी केलं. ते म्हणाले.

**<u>बोलक्या बाहुल्या</u>**

लोणावळ्याच्या कल्पना चावला स्पेस अकॅडमीचे संचालक डॉ. संजय पुजारी यांनी मतदान जनजागृतीसाठी एक विशेष उपक्रम घेतला. बोलक्या बाहुल्याच्या माध्यमातून ते नागरिकांना मतदान करण्याचं आवाहन करत आहेत.

**<u>पीएम</u>**

पंतप्रधान नरेंद्र मोदी सध्या नायजेरिया, ब्राझिल आणि गुयाना या तीन देशांच्या दौऱ्यावर आहेत. त्यांनी काल नायजेरियाचे अध्यक्ष बोला अहमद तिनुबू यांच्याशी द्विपक्षीय चर्चा केली. पंतप्रधान मोदी यांना ग्रँड कमांडर ऑफ द ऑर्डर ऑफ द नायजर, हा नायजेरियातला सर्वोच्च सन्मान प्रदान करण्यात आला. हा केवळ व्यक्तिशः आपला सन्मान नाही तर सर्व भारतीयांचा सन्मान आहे, अशी भावना पंतप्रधान मोदी यांनी यावेळी व्यक्त केली. अबुजा इथं त्यांनी भारतीय समुदायाला संबोधित केलं. नायजेरियाच्या अर्थव्यवस्थेत भारतीयांचं मोठं योगदान असल्याचं मोदी म्हणाले. नायजेरियाचा यशस्वी दौरा आटोपून पंतप्रधान ब्राझीलला रवाना झाले आहेत.

**<u>इफफी</u>**

प्रसिद्ध चित्रपट निर्माते, दिग्दर्शक आशुतोष गोवारीकर यांची 2024च्या भारतीय आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सव अर्थात इफ्फीसाठी आंतरराष्ट्रीय ज्युरीचे अध्यक्ष म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे.

चित्रपट हा काळासोबत सतत विकसित होत आहे आणि या उत्क्रांतीचा साक्षीदार होण्यासाठी आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सव हे एक चांगलं व्यासपीठ आहे; त्याचा एक भाग होण्याची मला मिळालेली संधी हा माझा सन्मान आहे, अशी प्रतिक्रिया गोवारीकर यांनी व्यक्त केली.

**<u>हॉकी</u>**

बिहारमध्ये सुरू असलेल्या महिलांच्या आशिया चषक हॉकी स्पर्धेत काल भारतानं जपानवर 3 – 0 अशी मात करत आपली विजयी घोडदौड कायम ठेवली. नवनीत कौर आणि दीपिका कुमारी यांनी चमकदार खेळी करत भारताला विजय मिळवून दिला. या स्पर्धेच्या उपांत्य फेरीत उद्या पुन्हा भारताच्या संघाची लढत जपानशी होणार आहे.

**<u>हवामान</u>**

उद्यापर्यंतच्या हवामानाच्या अंदाजानुसार राज्यात सर्वत्र हवामान कोरडं राहील, असा अंदाज वेधशाळेनं व्यक्त केला आहे.

# आकाशवाणी पुणे केंद्राचं प्रादेशिक बातमीपत्र संपलं. नमस्कार.